मुंबई शहरातील १०० टक्के अतिरिक्त चटई निर्देशांक
अनुज्ञेय असलेल्या इमारतीमधील एकूण बांधकाम
क्षेत्रफळाच्या ८० टक्के क्षेत्रामध्ये अनुज्ञेय वित्तीय सेवा.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.आयएमसी २००८/(प्र.क्र.४६)/उद्योग-२
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १३.८.२००८

**शासन निर्णय :**

शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.आयटीपी २००७/(प्र.क्र.१७३२)/उद्योग-२ दि. ३.५.२००७ नुसार मुंबई प्राधिकरण विभागातील अस्तित्वात असलेल्या तसेच नवीन माहिती तंत्रज्ञान उद्यानातील माहिती तंत्रज्ञान उद्योग / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांकरिता राखीव असलेल्या ६० टक्के / ८० टक्के बांधकाम क्षेत्रफळामध्ये बँक, विमा कंपनी, रोखे खरेदी विक्री व्यवसाय/उद्योग, म्युच्युअल फंड इत्यादी वित्तीय सेवा देणा-या आस्थापनांसाठी (१०/३० टक्के) उपयोग करणे अनुज्ञेय करण्यात आले आहे.

२. मुंबई आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून विकसीत करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांना सहाय्य व वित्तीय सेवांमध्ये रोजगार निर्मितीच्या संधी तसेच या क्षेत्रातील गुंतवणूकदारांची वाढती मागणी लक्षात घेऊन मुंबई शहरातील ज्या इमारतींना १०० टक्के अतिरिक्त चटई निर्देशांक अनुज्ञेय आहे अश्या इमारतीमधील एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या ८० टक्के क्षेत्र माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा व्यतिरिक्त वित्तीय सेवा याकरिता वापरता येईल. सदर सेवांमध्ये बँक, विमा कंपनी, रोखे खरेदी विक्री व्यवसाय/उद्योग, म्युच्युअल फंड इत्यादी वित्तीय सेवा देणा-या आस्थापनांसोबत खालील नमूद केलेल्या सेवा देणा-या आस्थापनांचाहि समावेश असेल.

> "कॉर्पोरेट फायनान्स, असेट अँड फंड मैनेजमेंट, ब्रोकिंग, नॉन बँकिंग फायनांशिअल कंपनी , रिसर्च अॅडव्हायझरी, टॅक्स अँड ऑडिट, बिझनेस अँड मॅनेजमेंट कन्सल्टन्सी, ट्रँझॅक्शन सर्व्हिसेस, ट्रेझरी ऑपरेशन्स, रिस्क मैजनेजमेंट अँड क्रेडिट सर्व्हिसेस"

३. मुंबई शहरातील १०० टक्के अतिरिक्त चटई निर्देशांक अनुज्ञेय आहे अश्या इमारतीमधील एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या ८० टक्के क्षेत्र माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा यासह वित्तीय सेवा याकरिता वापराबाबतच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीत करावयाचे आवश्यक ते बदल हे नगर विकास विभागामार्फत करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय नगर विकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५८९ दिनांक २८ जुलै, २००८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असनू त्याचा संगणक संकेतांक २००८०८१३१३३८२४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

छासुअग्निहोत्री

(छा. सु. अग्निहोत्री)
कार्यासन अधिकारी

१. प्रधान सचिव, महसूल (पुर्नवसन) विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई ३२.
४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.
५. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
७. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई
९. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई
१०. विभागीय आयुक्त, मुंबई
११. निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई
१२. उद्योग विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव/ क [illegible]धिकारी
१३. निवड नस्ती (उद्योग-२)